दिनांक :  .१.२०१९

प्रति,

**मा. मुख्यमंत्री,**
**मुंबई, महाराष्ट्र.**

**विषय : हिंदु धर्मातील पवित्र धर्मग्रंथ 'मनुस्मृति'चे दहन करणाऱ्यांवर कारवाई करण्याविषयी...**

महोदय,

नुकतेच २४ डिसेंबर २०१८ या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी वैजापूर येथे समता परिषदेच्या मेळाव्यात मनुस्मृतीचे दहन केले. '२५ डिसेंबर' हा समाजात राजकीय द्वेष पसरवणाऱ्या काही निवडक राजकारण्यांकडून 'मनुस्मृति दहन दिन' म्हणून साजरा केला जातो. २५ डिसेंबर १९२७ या दिवशी महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिल्यांदा मनुस्मृतीचे दहन केले होते. तेव्हापासून असा दिवस साजरा केला जातो, असे काही मंडळी सांगत आहेत. आजपर्यंत गेल्या ९१ वर्षांत अनेकदा मनुस्मृति जाळण्यात आली. कोणताही ग्रंथ जाळून त्यातील विचार जळत नाहीत. मुळातच हिंदूंचा एक पवित्र धर्मग्रंथ जाळणे, हे राज्यघटनाविरोधी आणि हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारे आहे. मनुस्मृतीचा कोणताही अभ्यास न करता ती जाळणे, ही कृती अविवेकी आहे.

मुळात मनु कोण होता ? मनुस्मृतीत काय लिहिले आहे ? याविषयी काहीही माहिती नसते. केवळ ब्राह्मणद्वेष हेच कारण यामागे असते. मनुस्मृती न वाचता त्यावर टीका करणे, हे अविवेकी आहे. त्यामुळे आम्ही **मनुस्मृतीमध्ये काय सांगितले आहे, त्यामुळे ती जाळणे कसे अयोग्य आहे, याविषयी काही सूत्रे थोडक्यात येथे देत आहोत.**

१. 'मनु जन्माने ब्राह्मण होता', असे गृहीत धरून ब्राह्मणद्वेषापोटी त्यांच्या नावाने काही जण गोंधळ घालतात. खरेतर मनु हे ब्राह्मण नव्हते, ते इश्वाकु वंशाचे, म्हणजेच प्रभु श्रीरामचंद्र ज्या वंशाचे होते, त्या वंशातील क्षत्रिय होते.

२. **'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते । रमन्ते तत्र देवताः । यत्रैस्तास्तु न पूज्यन्ते । सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।' असे महर्षि मनु यांनी मनुस्मृतीत 'अध्याय ३, श्लोक ५६' मध्ये म्हटले आहे.** याचा अर्थ 'जेथे स्त्रियांची पूजा केली जाते, तेथे देवता रममाण होतात. जेथे त्यांची पूजा होत नाही, अवहेलना होते, तेथे सर्व कार्ये निष्फळ होतात.'

३. लौकिक आणि पारलौकिक उत्कर्षाकरता 'स्त्रीचा सन्मान करा, पूजन करा. तिला कधीही दुखवू नका', असे महर्षि मनु यांनी वारंवार खडसावून सांगितले आहे.

४. भारतीय राज्यघटना अस्तित्वात येऊन ७० वर्षेही झाली नाहीत. याआधी सहस्रो वर्षे मनुस्मृति अस्तित्वात होती. मनुस्मृतीच्या आधारे कलियुगातील कोणतीही राज्यव्यवस्था नव्हती, ती अगोदरच्या युगांसाठी होती.

५. मध्ययुगीन काळ ते आताच्या काळापर्यंत युरोपियन स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य नव्हते. इंग्लंडमध्ये इ.स. १८८२ पर्यंत स्त्रीला धनाचा अधिकार नव्हता. विवाहित स्त्रीला स्वतःचे स्त्रीधन बाळगण्याचा अधिकार इंग्लंडमध्ये इ.स. १८८८ पर्यंत नव्हता. आपल्याकडे मनु आणि याज्ञवल्क्य यांच्या काळापासून स्त्रीधनाचा अधिकार अबाधित आहे.

६. मनुस्मृतीत म्हटले आहे की, गृहिणी आणि कुटुंबातील धन हे दोन्ही समान आहेत. मनु यांनी वैभवाइतकेच स्त्रियांना महत्त्व दिले आहे. स्त्री असेल, तरच वैभव उपयुक्त ठरते. स्त्रीच्या अभावी वैभव असून नसल्यासारखे आहे.

७. वेदाध्ययनाद्वारे कायदा आणि न्यायव्यवस्था यांविषयी आदर्श कसे हवे, यासाठी मनु यांनी 'मनुस्मृति' हा ग्रंथ लिहिला होता.

८. वर्ष १७९४ मध्ये विल्यम जोन्स या इंग्रजाने मनुस्मृतीचा अनुवाद इंग्रजीत केला. नित्शे या जर्मन तत्त्ववेत्त्यावर मनुस्मृतीचा विलक्षण प्रभाव पडलेला दिसतो. तो म्हणतो, 'मनुसारखा स्त्रीच्या संदर्भात अत्यंत प्रेमळ आणि उदार

मनस्क, असा महान पुरुष या पृथ्वीवर दुसरा कोणी झाला नाही आणि व्हायचा नाही. बायबल बंद करा आणि मनुस्मृति उघडा.' राज्यशासनाने प्रसिद्ध केलेल्या मराठी विश्वकोष खंड क्र. १२ मध्ये ही माहिती दिलेली आहे.

९. मनुस्मृति हा हिंदूंचा धर्मग्रंथ आहे. मात्र वर्तमानात मनुस्मृती वाचून कोणी त्याप्रमाणे आचरण करत नाही, मनुस्मृतीनुसार कायदे लागू नाहीत. हिंदु धर्मात काळानुसारही धर्मशास्त्रांत नियम सांगितले आहेत. त्यानुसार मनुस्मृती ही कलियुगासाठी लिहलेली नाही. जर तिचे आचरण कोणी करत नाही, तर विरोध असण्याचेही काही कारण नाही.

१०. ज्या जातीयवादाविषयी मनुस्मृतीला दोषी ठरवले जाते, त्या मनुस्मृतीमध्ये जातीयवादाचा उल्लेखही नाही.

११. 'दलित' हा शब्दप्रयोग मनूने कधीच केला नाही. तो सर्वप्रथम इंग्रजांनी भारतात 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब करण्यासाठी आणला. इंग्रजांनी मनुस्मृतीचा चुकीचा अनुवाद पसरवून भारतात जातीयवाद निर्माण होईल, असे प्रयत्न केले. कोणत्याही हिंदु धर्मग्रंथात 'दलित' या शब्दाचा उल्लेख नाही.

१२. महर्षि मनु यांनी सांगितले आहे, 'जन्मना जायते शूद्रः ।' म्हणजेच व्यक्ती जन्मतः शूद्रच असते. नंतर ती तिच्या गुण-कर्मानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र होते. जरी एखाद्या ब्राह्मणाचे अपत्य गुण-कर्मानुसार ब्राह्मण नसेल, तर त्याला अन्य वर्णीय ठरवले जाते. तसेच शूद्राचे अपत्य गुण-कर्मानुसार ब्राह्मण, क्षत्रियही ठरवले जाते. याची उदाहरणेच द्यायची, तर एका मत्स्यगंधेचा पुत्र व्यास आपल्या तपश्चर्येने महर्षि व्यास झाले. विश्वामित्र हे आधी क्षत्रिय होते, ते साधना करून ऋषि झाले. दरोडे घालणारा वाल्या कोळी तपश्चर्या करून वाल्मीकि ऋषि झाला. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील.

१३. आजही शासन-प्रशासनात चार वर्गांनुसार अधिकाऱ्यांच्या श्रेणी ठरतात. आजही अनेक क्षेत्रांत वर्गवारी गुण-कर्मानुसारच ठरवली जाते. ती आपण मान्यच करतो. मग धर्मग्रंथांत लिहिलेले का मान्य नाही ?

१४. महर्षि मनु यांनी वेदांचा अभ्यास करून कायदा-सुव्यवस्था आणि न्यायव्यवस्था यांसाठी मनुस्मृति हा ग्रंथ लिहिला. अजूनही राजस्थानच्या न्यायालयाबाहेर महर्षि मनु यांचा पुतळा आहे, जो अनेक वर्षांपासून आहे.

१५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला दिलेल्या राज्यघटनेमध्येच धर्मस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य दिले आहे. हे कदाचित डॉ. आंबेडकर यांचे नाव घेऊन 'मनुस्मृति' जाळणाऱ्यांना माहिती नसावे. डॉ. आंबेडकर यांनी 'मनुस्मृति'चे दहन प्रतिकात्मक केले होते; मात्र बाबासाहेब ११ जानेवारी १९५० यादिवशी मुंबई येथील सिद्धार्थ महाविद्यालयाच्या संसदेसमोर बोलताना म्हणाले की, मी जातिनिर्णयासाठी मनूचा, घटस्फोटासाठी पाराशर स्मृतीचा, स्त्रियांच्या हक्कासाठी बृहस्पतीच्या स्मृतीचा आधार घेतला आहे. दायभाग पद्धतीच्या वारसा हक्कासाठी मनुस्मृतीचा आधार घेतला आहे. (समग्र भाषणे, खंड ८, पान क्र.१७-१८ / जनता, १४.१.५०)

महिलांच्या अधिकारांच्या संदर्भात मनुस्मृतीने सर्वांत आधी महिलांना संपत्तीतील चौथा हिस्सा दिला आहे, याचे डॉ. आंबेडकर यांनी कौतुकही केले आहे. असे असतांना विनाकारण मनुस्मृति जाळणे कितपत योग्य आहे ?

१६. 'मनुस्मृति' हा एक असा ग्रंथ आहे, ज्यावर साम्यवादी आणि हिंदुविरोधी यांच्या विकृत जोडगोळीने वारंवार गरळओक केली. सनातन धर्माला लक्ष्य करण्यासाठी हिंदुद्वेष्ट्यांनी मनुस्मृतीमधील श्लोकांची मोडतोड केली. या श्लोकांचा संदर्भ देऊन या ग्रंथाविषयी धादांत असत्य गोष्टी पसरवल्या गेल्या आणि हिंदुद्वेषी राजकारण्यांनी त्याचा स्वार्थासाठी उपयोग केला.

१७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना कोणताही धर्मग्रंथ जाळण्याची अनुमती देते का ?, याविषयी कोणीही बोलत नाही. हिंदूंचा एक धर्मग्रंथ सार्वजनिकरित्या जाळला जातो, हा हिंदूंचा, राज्यघटनेचा आणि पर्यायाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाच अवमान आहे.

*** तरी या निवेदनाद्वारे आम्ही मागणी करतो की,**

१. 'मनुस्मृति' हा हिंदु धर्मग्रंथ असून त्याचे दहन करणे अत्यंत घटनाबाह्य आहे, हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारे आहे. त्यामुळे 'मनुस्मृति' दहन करणाऱ्यांवर भारतीय दंडविधानानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

२. भारतभरात मनुस्मृतीवर कोणतीही बंदी नाही, तरी तिच्यावर बंदी आहे, अशी खोटी आवई उठवून ती

जाळणाऱ्यांवर न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी कठोर कारवाई करावी.

३. कोलकता कुराण पेटीशनमध्ये कोलकता उच्च न्यायालयाने मान्य केले आहे की, कुराणातील काही आयते या समाजात विद्वेष पसरवणाऱ्या आहेत. त्यात काफिरांच्या हत्येविषयी सांगितलेले आहे. मग हे देशाच्या घटनेच्या विरोधात निश्‍चितच आहे. मात्र असे असतांनाही त्याला धर्मग्रंथाची मान्यता देऊन पूजले जाते. ही वस्तुस्थिती असतांना मनुस्मृतीला द्वेषमुलक मानून तिला जर जाळले जात असेल, तर उद्या कुराणाच्या संदर्भातही हाच न्याय लावता येईल का ?, असा प्रश्‍न समाजात उपस्थित होत आहे.

४. श्री. छगन भुजबळ हे जनतेच्या धनाच्या अपहार प्रकरणी भ्रष्टाचाराच्या विविध गुन्ह्यांमध्ये कारागृहात होते. जनतेला लुबाडणारे हे जनतेच्या सुशासनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेचा अपमान करत नाहीत का ? ते सध्या जामिनावर मुक्त होऊन अशी हिंदूंमध्ये रोष निर्माण करणारी कृत्ये करत आहेत. जामिनावर मुक्त झालेल्यांना समाजात विद्वेष पसरवणाऱ्या कृती करण्याची अनुमती कशी काय मिळते ? त्यामुळे या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा.

आपला विश्‍वासू,

(संपर्क : )